**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ३९० / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. पुरूषोत्तम विश्वनाथ त्रिवेदी,
२८, रा.विवेकानंद सोसायटी, यवतमाळ,
जि.यवतमाळ ४४४००१.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, यवतमाळ,
जि.यवतमाळ.

२. जन माहिती अधिकारी,
पेंशन विभाग, शिक्षण विभाग (प्राथमिक),
जिल्हा परिषद, यवतमाळ,
जि.यवतमाळ.

**(आदेश पारीत दिनांक २०/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी तर्फे विस्तार अधिकारी, शिक्षण विभाग, (माध्य.) जिल्हा परिषद, यवतमाळ श्री.डि.जे. रामटेके हे हजर आहेत.

सदर प्रकरणात अपिल क्रमांक १३१६/२००९ मध्ये दिनांक ०५/०८/२०१० ला हया आयोगाने निर्णय दिलेला आहे. अपिल क्रमांक १३१६/२००९ मधील प्रपत्र ‘अ’व हया प्रकरणातील प्रपत्र ‘अ’ हे सारखेच असुन दोन्ही प्रकरणातील माहिती एकच असल्याचे उत्तरवादी यांचे तर्फे सांगण्यात आले. तसेच हया प्रकरणातील प्रपत्र ‘अ’मधील दिनांक ०३/०९/०९ च्या नुसार मागितलेली माहिती दिनांक ०५/१०/०९, दिनांक २५/०८/२०१० व त्यानंतर दिनांक १८/१२/२०१० ला दिलेली आहे. तसेच दोन्ही अपिलातील प्रपत्र ‘अ’ व प्रपत्र ‘क’हे सारखेच आहे.

वरील बाबी लक्षात घेता अर्जदाराचे अपिल खारीज करण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ३९१ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. रामेश्वर लक्ष्मीनारायण कहाळे,
देवपेठ, वाशिम, जि.वाशिम.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय,
वाशिम, जि.वाशिम.

२. जन माहिती अधिकारी तथा
पोलीस उपअधिक्षक (गृह), मुख्यालय, वाशिम,
जि.वाशिम.

**(आदेश पारीत दिनांक २०/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी तर्फे ॲड. श्री.ओ.एम. राठी हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक, वाशिम श्री.सुभाष कांबळे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तर्फे पोलीस निरीक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम, श्री.पि.बी. राठोड हे हजर आहेत.

अर्जदार श्री. रामेश्वर लक्ष्मीनारायण कहाळे यांनी प्रपत्र 'अ' नुसार दिनांक ११/११/२००९ रोजी माहिती अधिकारी, पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम यांचेकडे माहिती मागितली. ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१/१२/२००९ ला अर्जदाराला दिली. त्यानंतर अर्जदाराचे समाधान न झाल्याने अर्जदाराने दिनांक ०७/०१/२०१० ला प्रपत्र 'ब'नुसार पोलीस अधिक्षक, वाशिम यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले व त्यानंतर दिनांक २०/०३/२०१० रोजी हया आयोगासमोर प्रपत्र 'क'दाखल केले व त्यात दिनांक २२/०२/२०१० ला ४५ दिवस पुर्ण होऊन सुध्दा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कुठलाही निर्णय दिलेला नसल्याचे म्हटले आहे. तसेच अर्जदाराचे रु. २००००/- रोखुन ठेवलेले आहेत त्या पैशाला अपिलीय अधिकारी जबाबदार आहे असे अर्जदाराचे म्हणणे आहे. ही बाब सत्य आहे की, प्रथम अपिलात कुठलाही निर्णय झालेला नाही, जेव्हा की, ४५ दिवसात प्रथम अपिल निकाली काढायला पाहिजे होते. सध्या कार्यरत असलेले अप्पर पोलीस अधिक्षक, वाशिम हे हजर आहेत व त्यांनी प्रथम अपिल आजपासुन ४ आठवडयाच्या आंत निकाली काढावे व त्याबाबत अर्जदाराला आगावु नोटीस पाठवावी, जेणेकरुन त्यांना हजर राहता येईल. सदर प्रकरणात कुठली माहिती अपुर्ण आहे याबद्दल लेखी निवेदन दयावे व जन माहिती अधिकारी व अर्जदार यांचे म्हणणे ऐकुन घेवुन अपिलीय अधिकारी यांनी स्वयंस्पष्ट निर्णय दयावा व त्यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यास ९० दिवसात हया आयोगासमोर व्दितीय अपिल दाखल करु शकतो. तसेच अर्जदाराला झालेल्या शरिरीक, मानसिक व आर्थिक नुकसानाबाबत संबंधित प्राधिकरण अर्जदाराला रु.२०००/- (रु.दोन हजार फक्त) ६ आठवडयाच्या आंत अदा करावे व

सदरची रक्कम कोणाकडुन वसुल करायची याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यानीं वेगळा निर्णय घ्यावा.

खालील आदेश पारित करुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(आदेश)**

१. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आजपासुन ४ आठवडयाच्या आंत प्रथम अपिल निकाली काढावे.

२. तसेच अर्जदाराला झालेल्या शरिरीक, मानसिक व आर्थिक नुकसानाबाबत संबंधित प्राधिकरणाकडुन अर्जदाराला रु.२०००/- ६ आठवडयाच्या आंत अदा करावे व सदरची रक्कम कोणाकडुन वसुल करायची याबाबत त्यांचे स्तरावरुन वेगळा निर्णय घ्यावा.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ३९४ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. त्र्यंबक सुर्यभान उमाळे,
गोकुल कॉलनी, पोस्टल क्वार्टर नं.सी-३,
अकोला, ता.जि.अकोला.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औदयोगिक विकास मंडळ,
जुना बडनेरा, बायपास रोड, अमरावती.
२.जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक क्षेत्र व्यवस्थापक,
महाराष्ट्र औदयोगिक विकास मंडळ,
प्रादेशिक कार्यालय, बडनेरा बायपास रोड जुना,
अमरावती.

**(आदेश पारीत दिनांक २०/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. त्र्यंबक सुर्यभान उमाळे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औदयोगिक विकास मंडळ, अमरावती श्री.अशोक चौधरी हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक क्षेत्र व्यवस्थापक, महाराष्ट्र औदयोगिक विकास मंडळ श्री.व्हि.जे. मुरमकर हे हजर आहेत.

सदर प्रकरणात प्रपत्र 'ब' दिनांक १८/१२/२००९ नुसार तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अर्जदाराच्या प्रथम अपिलात निर्णय न घेतल्यामुळे अर्जदाराला व्दितीय अपिल हया आयोगासमोर दाखल करावे लागले. तरी, सध्या कार्यरत असलेले अपिलीय अधिकारी हे १९ एप्रिल २०१० पासुन कार्यरत आहेत. त्यांनी दिनांक ०५/०१/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी घेवुन अर्जदार व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकुन नियमानुसार योग्य तो निर्णय घेवुन अर्जदाराने कलम १९(१) नुसार दाखल केलेले प्रथम अपिलात त्यानंतर ८ दिवसाचे आंत निकाल दयावा व त्याची प्रत अर्जदाराला दयावी. त्यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यास ९० दिवसात व्दितीय अपिल हया आयोगासमोर दाखल करु शकतात. तरी, त्यांनी अर्जदाराला झालेल्या शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रासाबद्दल रु.२००० /-(रु.दोन हजार फक्त) नुकसान भरपाई ६ आठवडयाच्या आत अदा करावी व सदर रक्कम कोणाकडुन वसुल करायची याबाबत वेगळा निर्णय अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर घ्यावा.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ३९२ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. अशोक वासुदेवराव जयसिंगपुरे,
टेलिफोन ऑफीस समोर, दारव्हा,
ता.दारव्हा, जि.यवतमाळ.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ,
जि.यवतमाळ.

२.जन माहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी, कुटूंब कल्याण पथक
यवतमाळ, जि.यवतमाळ.

**(आदेश पारीत दिनांक २०/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी तर्फे अधिक्षक, जिल्हा परिषद, आरोग्य विभाग, यवतमाळ श्री.वाय.एस. पाळेकर हे हजर आहेत.

अर्जदाराने हया आयोगाच्या नावांने दिनांक १८/१२/२०१० ला पत्र देवुन अर्जदाराला दिनांक १३/११/२००९ ला प्रपत्र 'अ' नुसार मागितलेली माहिती मिळालेली आहे व कुठलीही तक्रार राहिली नाही त्यामुळे प्रकरण खारीज करण्यात यावे, अशी विनंती केलेली आहे.

अर्जदाराची विनंती मान्य करण्यात येवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ३९५ / २०१०**
**अपिल क्र. ३९६ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. अरुण भानुदास दांदळे,
रा.खिरपुरी खुर्द, पो.खिरपुरी बु.,
ता.बाळापुर, जि.अकोला.
**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
बाळापुर, जि.अकोला.
२.जन माहिती अधिकारी तथा
सचिव, ग्रामपंचायत खिरपुरी खुर्द,
ता.बाळापुर, जि.अकोला.

**(आदेश पारीत दिनांक २०/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. अरुण भानुदास दांदळे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे कक्ष अधिकारी, पंचायत समिती, बाळापुर श्री.आर.जि. मसराम हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, खिरपुरी खुर्द, श्री.एन.एस. येवले हे हजर आहेत.

अर्जदाराने हया आयोगाच्या नावांने दिनांक २०/१२/२०१० ला पत्र देवुन अर्जदाराला अपिल क्रमांक ३९५ व अपिल क्रमांक ३९६ दिनांक ३०/११/२०१० बाबतची संपुर्ण माहीती मिळालेली असल्यामुळे सदरचे अपिल खारीज करण्याबाबत विनंती केलेली आहे.

अर्जदाराची विनंती मान्य करण्यात येवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ३९७ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. गजानन बिबिशन राठोड,
मु.सिंगडोह, पो.साखरडोह,
ता.मानोरा, जि.वाशिम.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी, मुर्तीजापुर,
ता.मुर्तीजापुर, जि.अकोला.

२.जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी कार्यालय,
मुर्तीजापुर, जि.अकोला.

**(आदेश पारीत दिनांक २०/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.गजानन बिबिशन राठोड हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, मुर्तीजापुर श्री.विजय शिराळ हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, मुर्तीजापुर श्री.डि.डी. कुलथे हे हजर आहेत.

अर्जदाराला प्रपत्र 'ब' नुसार प्रथम अपिलाच्या सुनावणीकरीता बोलाविले असता अर्जदाराला पत्र उशिरा मिळाल्यामुळे अर्जदार हजर राहु शकले नाही. तरी, सदर प्रकरणात अर्जदार दिनांक ३०/१२/२०१० रोजी पुन्हा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयात हजर राहतील व त्यांना २००७ ते २००९ मध्ये पंतप्रधान पॅकेज अंतर्गत कामाच्या माहितीचे निरीक्षण देण्यात येईल व त्यानंतर अर्जदाराला ज्या माहितीची आवश्यकता आहे ती विनाशुल्क अपिलाच्या सुनावणी दरम्यान पुरविण्यात येईल. त्यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यास व्दितीय अपिल ९० दिवसात हया आयोगासमोर करु शकतात. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी याआधी दिलेला निर्णय रद्दबादल ठरविण्यात येवुन अपिलीय अधिकारी यांनी पुन्हा सुनावणी घेवुन आदेश पारित करावा.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**